# -: प्रकरण चौथे :-

## वारणानगर मधील महिलांच्या सहकारी संस्थांचा परिचय

## (Womens' Co-operatives in Warananagar : An Introduction)

# ※ प्रकरण चौथे ※

# वारणानगर मधील महिलांच्या सहकारी संस्थांचा परिचय

(Women's Co-operatives in Warananagar : An Introduction)

## प्रास्ताविक :-

सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास हा प्रस्तुत संशोधनाचा विषय असल्याने वारणानगरमधील १) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ (वारणा बझार), २) श्री वारणा महिला गृह उद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर, ३) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर, ४) श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर या वारणानगर मधील महिलांच्या सहकारी संस्थांचा थोडक्यात परिचय या प्रकरणात करून दिला आहे.

## I) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ, वारणानगर (वारणा बझार) :-

वारणा बझार हे भारताच्या ग्रामीण भागातले पहिले ग्राहक सहकारी सकल वस्तु भांडार आहे. कै. तात्यासाहेबांनी ७ ऑगस्ट १९७६ साली या डिपार्टमेंटल स्टोअर्सची मुहूर्तमेढ रोवली व २ एप्रिल १९७८ रोजी 'वारणा बझार' हे सकल वस्तु भांडार सुरू झाले.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या घरातील सर्व लोकांच्या गरजा भागविल्या जाव्यात या उद्देशाने असे एकछत्री दुकान वारणानगर मध्ये असले पाहिजे अशी तात्यासाहेबांची इच्छा होती.

याठिकाणी काम करण्यासाठी असणाऱ्या नोकर वर्गामध्ये सुमारे ८०% प्रमाण हे स्त्रियांचे दिसून येते. इ. १० वी पर्यंत शिक्षण घेतलेलया स्त्रियांना या ठिकाणी नोकरी दिली जाते. वारणा बझारमध्ये सभासद संख्या पाहिली तर एकूण सभासद संख्या ९७७६ आहेत. त्यापैकी स्त्री

सभासद ७५५१ आहेत तर पुरूष सभासद २२२५ आहेत. यावरून सभासदांमध्ये देखील स्त्रियांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

या वारणा बझारची सुरूवातीच्या काळात रोजची सरासरी विक्री रू. १८,००० इतकी होती. आज वारणा बझारने खरोखरीच नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. २ डिपार्टमेंट स्टोअर्स, ३२ शाखा व २ विस्तार कक्ष असा वारणा बझारचा शाखाविस्तार आहे. आज सरासरी प्रत्येक शाखेची विक्री १०,००० ते ४०,००० रूपयापर्यंत आहे.

**१) <u>व्यवस्थापन व कार्यकारी मंडळ</u> :-**

वारणा बझार या सहकारी संस्थेमध्ये १६ संचालक पदे आहेत. या सर्व संचालक पदावर स्त्रियाच आहेत. याठिकाणी श्रीमती शोभाताई विलासराव कोरे ह्या चेअरमन या पदावर काम करित आहेत. या सर्व संचालिका या वारणा परिसरातील गावांमधीलच आहेत. या संचालिकांमधून कुशल व्यवस्थापनाच्या दृष्टिने, सोयीसाठी वेगवेगळ्या कमिट्या तयार केलेल्या आहेत. या कमिटींची मिटींग ही महिन्यातून दोन वेळा घेतली जाते. या वेळेस सर्व संचालिका आपापल्या विभागातील प्रश्न मांडतात व सर्वांच्या मते त्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले जाते. अशाप्रकारे व्यवस्थापनाचे कार्य चालते.

**२) <u>विविध विभाग</u> :-**

वारणा बझारमध्ये गोडाऊन विभाग, सेल्स विभाग, अकौंटस विभाग, प्रशासन विभाग हे चार मुख्य विभाग आहेत. या चार विभागामार्फत संपूर्ण कामकाज चालते.

गोडाऊन विभागात खरेदी केलेल्या मालाची साठवणूक केली जाते. याठिकाणी प्रथम मालाची निट निवड केली जाते. याठिकाणी ४१ महिला कर्मचारी या मालाची निवडणी करणे, मागणीप्रमाणे ठराविक वजनाचे पॅकिंग करणे, मालाच्या पॅकिंगवरती त्याचे वजन व दराचे लेबल लावणे

व तयार झालेल्या पॅकींगची (मालाची) मोजणी करणे इ. कामे करित असतात. मुख्य शाखा व इतर शाखांना गोडाऊन मधूनच मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा केला जातो. सेल्स विभागात वस्तूंची विक्री केली जाते. याविभागात सौंदर्य प्रसाधने विभाग, कापड विभाग, सायकल-विज विभाग, भांडी विभाग, धान्य विभाग, पादत्राणे विभाग, तयार कपडे विभाग, स्टेशनरी विभाग इ. उपविभागाद्वारे मालाची विक्री केली जाते. अकौंटस विभागात वारणा बझारने खरेदी केलेल्या मालाची आवक-जावक, बीले, हिशेब तपासणी, नफा-तोटा अंदाजपत्रके, कामगारांचे पगार इ. कामे केली जातात. तर प्रशासन विभागात मालाची खरेदी, विक्रीचा दर ठरविणे, सर्व शाखांचे कामकाज पहाणे, खरेदी केलेल्या मालाची बिले पाठविणे इ. कामे केली जातात.

३) <u>स्वरूप व रचना</u> :-

वारणा बझार, वारणानगर हे सध्या ९२९ चौ. मी. क्षेत्रफळ क्षेत्रात उभ्या असलेल्या ईमारतीत सुरू आहे. या ठिकाणी गृहपयोगी वस्तूंची देवाण-घेवाण केली जाते. हे भांडार सुरू करण्यापूर्वी सभोवतालच्या परिसरातील जनतेच्या गरजांचा अभ्यास केला आहे. या भांडारात एकूण १६ विभागांमधून अनेक प्रकारच्या वस्तू उपलब्ध केल्या आहेत. येथे सर्व प्रकारची धान्ये, कडधान्ये, डाळी, मसाल्याचे पदार्थ, चहा, कॉफी, लोणची, कापड, भांडी, औषधे, वह्या, पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, वीज उपकरणे, सायकली व त्यांचे सुट्टे भाग उपलब्ध आहेत.

तसेच ग्रामीण भागातील भांडार असलेने शेतीसाठी लागणारे विजेचे पंपस्, शेती अवजारे, बी-बीयाणे, पिकांवरील किटकनाशके यांचाही समावेश केला आहे. त्याचबरोबर नव्याने सुरूवात केलेल्या बी. पी. एल्. कंपनीचे टि.व्ही, रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, इस्त्री, टेलिफोन, बॅटरी अशी अनेक विद्युत उपकरणे इ. ची उपलब्धता आहे. तसेच अलिकडील काळात वारणा बझारने ‘हिरा-होंडाची डिलरशीप’ टू व्हीलर ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात यश संपादन केले आहे.

## ४) वार्षिक उलाढाल :-

शाखेसाठी खेडी निवडताना सभोवतालच्या ४/६ खेड्यांना त्याचा लाभ होईल अशी ठळक व मध्यवर्ती खेडी निवडली आहे. या शाखांची दैनंदिन विक्री १०,००० ते ४०,००० रू. पर्यंत आहे. एकूण संस्थेची म्हणजे २ डिपाटमेंट स्टोअर्स, ३२ शाखा व २ एक्सटेंशन काउंटर यांची ३१ मार्च २००१ अखेर वार्षिक विक्री रू. ४३.८१ कोटी एवढी आहे.

## ५) विक्रीसाठी उपलब्ध केल्या जाणाऱ्या मालाची खरेदी :-

विक्रीसाठी माल खरेदी करणे हे निर्दोषपणे व जानतेपणाने झाले पाहिजे. केवळ अयोग्य खरेदीमुळे अनेक ग्राहकसंस्था बंद पडल्या आहेत. वारणा बझारमध्ये खरेदीचे कामामध्ये माल विक्रेत्यांना व विभाग प्रमुखांना समाविष्ठ करून घेतले जाते. विक्रेत्याकडून माल मागणीची यादी तयार झाल्यावर ती सेल्स सुपरवायझर यांचेकडून छाननी घेऊन पर्चेस मॅनेजर यांचेकडे जाते. व त्या सर्वांची यादी तयार करून त्यास परचेस कमिटीची व जनरल मॅनेजर यांची मंजूरी घेतली जाते. अशा तऱ्हेने प्रत्यक्ष विक्रेत्यांना खरेदीच्या कामामध्ये समाविष्ठ केल्यामुळे त्यांना प्राधान्य मिळले. आपणही संस्थेच्या कामातील घटक आहे असे वाटते व त्यादृष्टीने त्यांचेकडून चांगले व जिव्हाळ्याने विक्रीचे काम केले जाते.

वारणा बझार ही संस्था ग्रामीण भागात असल्यामुळे विक्रीसाठी लागणारा बहूतेक माल बाहेर गावाहून मागवून घ्यावा लागतो. त्यासाठी नजीक असलेल्या कोल्हापूर व सांगली या बाजारपेठांखेरीज मुंबई, पुणे, सुरत, सोलापूर यासारख्या शहरांकडून तर काही माल परराज्यातून खरेदी करावा लागतो. परराज्यातून म्हणजे ज्या राज्यात प्रत्यक्षात कोणत्या मालाचे उत्पादन होते त्या ठिकाणाहून माल खरेदी केला जातो. प्रत्येक वस्तुंच्या उगम स्थानापासूनच त्या वस्तूंची खरेदी करण्याचे धोरण तात्यासाहेबांनी सर्व व्यवस्थापनाच्या अंगवळणी पाडले आहे. तसे केल्याने ती वस्तू कमी किंमतीत खरेदी करता येते. त्याशिवाय ती वस्तू इतर किरकोळ विक्रेत्यांपेक्षा कमी दराने विक्रीसाठी

ग्राहकाला उपलब्ध करून देता येते. म्हणून अशा गोष्टींचा अभ्यास करून काही वस्तूंची खरेदी परराज्यातून केली जाते. उदा. मसाल्याचे सर्व पदार्थ गुजरात तर खोबरे, सुपारी, शाबूदाणा, वेलदोडे यांची कर्नाटक राज्यातून खरेदी केली जाते.

६) **<u>मालाचा आवश्यक साठा</u>** :-

ग्राहकांच्या गरजेप्रमाणे माल वेळेवर उपलब्ध होणेसाठी मुख्य गोदामामध्ये सर्व प्रकारच्या जीवनावश्यक मालाचा आवश्यक तितक्या प्रमाणात साठा करावा लागतो. त्यामुळे माल उपलब्ध नाही अशी परिस्थिती निर्माण होत नाही.

७) **<u>वाहतूक व्यवस्था</u>** :-

जवळपासच्या शहरांतून दैनंदिन माल खरेदीसाठी व संस्थेच्या सर्व शाखांना वारणानगर या मुख्य कार्यालयातून मालाचा पुरवठा करण्यासाठी वाहतूक व्यवस्थेची तरतुद केली आहे. संस्थेकडे सध्या ४ मोठे ट्रक्स, व २ छोटे ट्रक्स आणि पेट्रोल पंपाकरिता २ टँकर वाहतून व्यवस्थेसाठी उपलब्ध आहेत.

८) **<u>स्वयंसेवा पद्धतीचा अवलंब</u>** :-

वारणा बझारने सुरवातीपासून ग्राहकांना स्वयंसेवा पद्धतीचा अवलंब केला आहे. हि स्वयंसेवा पद्धत संस्थेच्या २ डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये व एकूण ३२ शाखांमध्ये कार्यरत आहे. औषधे, नकली दागीने, घड्याळे वगैरे काही अन्य बाबी वगळता इतर सर्व विभागासाठी स्वयंसेवा (Self-Service) व स्वयंनिवड (Self-Selection) पद्धत प्रचलीत आहे. या पद्धतीत ग्राहकास स्वत: पाहून, पसंत करून माल खरेदी करता येतो. त्यामुळे ग्राहकास आनंद मिळतो.

९) **<u>हिशोब पद्धती</u>** :-

वारणा बझारकडे 'मॅनेजमेंट अकौंट सिस्टीम' (M.A.S.) व मॅनेजमेंट इन्स्ट्रुमेंट सिस्टीम (M.I.S.) चा वापर केला जातो. मुख्य कचेरीसह सर्व शाखांचे दरमहा ताळेबंद काढले

जातात व पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत ते मुख्य कचेरीकडे येतात. मुख्य कचेरीचा व शाखांचा एकत्रित ताळेबंद दरमहा १५ तारखेपर्यंत तयार केला जातो. दरमहा विक्रीचा आढावा घेतला जातो. बजेटपेक्षा कमी व जादा विक्रीची कारणवारी बाबत संबंधीत विभागप्रमुख व विक्रेत्यांशी चर्चा करून त्यातील त्रुटी काढल्या जातात.

**१०) <u>ग्राहकांचा प्रतिसाद</u> :-**

संस्थेने व व्यवस्थापनाने ग्रामीण भागांमध्ये सुरू केलेल्या ह्या शाखांचा सर्वसामान्य लोकांना चांगलाच उपयोग होत आहे. प्रत्येक शाखेकडे अंदाजे दररोज ७५० ते १००० ग्राहकांकडून खरेदी होते. आठवडा बाजार असलेल्या दिवशी विक्री ही नेहमीच्या विक्रीच्या दिडपट असते.

**११) <u>प्रशिक्षण वर्ग</u> :-**

वारणा बझारने हे कार्य स्वत:पुरतेच मर्यादित ठेवले नाही. देशातील अनेक ठिकाणाहून वारणा बझारच्या धर्तीवर स्टोअर्स काढण्यासाठी व माहिती घेण्यासाठी अनेक लोक येतात. ज्या लोकांनी भांडार काढण्याची जिद्द धरली आहे त्यांना सर्व माहिती वारणा बझार देण्याचे काम करते. वारणा बझार मध्ये सेवक नोकरीसाठी घेत असताना त्यास संपूर्ण कामकाजाचे प्रशिक्षण दिले जाते. सदरचे प्रशिक्षण दरवर्षी ५ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत घेतले जाते. प्रशिक्षणामध्ये विविध विषयावर व्याख्याने, हिशेब पुस्तके, त्यांचा वापर व ओळख, विक्रीसाठी आवश्यक गुण, सर्व प्रकारची विक्री कागदपत्रे कसे भरावी यासंबंधीचे ज्ञान, नियमांचे पालन याची माहिती दिली जाते.

सदरच्या प्रशिक्षणातून सवेक वर्ग कितपत प्रशिक्षित झाला आहे हे पाहण्यासाठी त्यांची चाचणी परीक्षा घेतली जाते व उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते.

**१२) <u>विशेष उपक्रम</u> :-**

१) "वारणा बझार" मार्फत वर्षातून १ ते २ वेळा "तांदूळ महोत्सव" साजरा केला जातो. या वेळेस सर्व प्रकारचे तांदूळ विक्रीसाठी आणले जातात व त्याचे प्रदर्शन केले

जाते. याचा ठराविक कालावधी असतो. या वेळेस तांदूळ खरेदी करणाऱ्या गिऱ्हाईकांना दरामध्ये थोड्याफार प्रमाणात सवलत दिली जाते.

२) "वारणा बझार" मार्फत वारणागनरमधील सर्व वारणा उद्योग व शिक्षण समुहातील संस्थांना क्रेडिट कार्ड देण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे संस्थेसाठी कोणतीही वस्तू खरेदी करावयाची असेल तर ती वारणा-बझार मधूनच खरेदी केली जाते. त्यामुळे सर्व वारणानगरमधील संस्थांचा खरेदीसाठी बाहेर जाणारा पैसा हा वारणानगरमध्येच फिरविला जातो.

३) वारणा बझारच्या सभासदांना त्यांनी घेतलेल्या वारणा बझारच्या शेअर्सच्या किंमतीच्या पटीत कुपन दिले जाते. दिवाळीचा वेळेस सभासदांच्यासाठी ठराविक किंमतीपर्यंत वस्तूंची खरेदी करण्यासाठी वस्तूंच्या दरामध्ये सवलत दिली जाते.

४) दिवाळीच्या वेळेस तसेच गुढीपाडव्याच्या वेळेस 'लकी-ड्रॉ' ही योजना राबविली जाते. यावेळस रू. २५० किंमतीच्या मालाच्या खरेदीवर १ कुपन दिले जाते. त्यासाठी वेगवेगळी बक्षिसे लावली जातात. याचा उद्देश म्हणजे लोकांनी वारणा-बझारमधून जास्तीत जास्त माल खरेदी करावा हा आहे. या योजनेची मुदत संपलेनंतर सर्वांच्या समोर नियोजीत तारखेदिवशी 'लकी-ड्रॉ' ची सोडत केली जाते.

**१३) <u>पारितोषिके व बहुमान</u> :-**

महाराष्ट्र राज्यातील एक उत्कृष्ठ सहकारी संस्था म्हणून राष्ट्रीय सहकारिता विकास तथा ग्रामीण प्रबंधक संस्था, अमरावती यांनी आयोजीत केलेल्या १० व्या राज्यस्तरीय मुल्यमापन स्पर्धेत 'वारणा बझार' या संस्थेला बहूमान मिळाला आहे.

## II) श्री वारणा महिला गृह उद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर :-

श्री वारणा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीनंतर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या महिलांना उद्योग मिळवून देण्याचे दृष्टिने मा. कै. तात्यासाहेबांनी मुंबई येथील श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड या महिलांच्या संस्थेस भेट दिली. त्यांच्या या भेटीमुळे वारणानगरमध्ये 'लिज्जत पापड' ची उत्पादन शाखा सन १९७४ साली सुरू झाली. सुरूवातीला मुंबई येथील काही भगिनी वारणानगरमधील महिलांना पापडाचे प्रशिक्षण देण्याकरिता आल्या होत्या. सुरूवातीला पापड लाटणे काही महिलांना कमीपणाचे वाटे म्हणून मा. सावित्री कोरे (आक्का) यांनी घरी पापडाचे पीठ नेऊन पापड लाटण्यास सुरूवात केली. त्यामुळे बऱ्याच महिलांच्यावर याचा प्रभाव पडला. पापड लाटणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ झाली. या शाखेकडील कामकाज पहाटे ५ वाजल्यापासून सुरू होते. पहाटे महिलांना पीठ मळून, कुटून वजन करून दिले जाते व दुसऱ्या दिवशी महिला पापड तयार करून आणतात व पापड घालून मजुरी घेऊन दुसरे पीठ घेऊन जातात. पापडाचे पॅकींगही सकाळीच केले जाते. ही सर्व कामे सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत चालतात. या उद्योगामधील प्रत्येक महिला दर दिवशी रू ५० ते ८० रूपये पर्यंत उत्पन्न मिळवू शकते. प्रतिकिलोस रू. १२ प्रमाणे पापड लाटण्यास मजूरी दिली जाते. मजुरीशिवाय महिलांना दरवर्षी दिपावलीवेळी बोनस स्वरूपात जादा मजूरी दिली जाते. महिलांना घरबसल्या आपले घर सांभाळून करता येण्यासारखा उद्योग आहे. यामुळे महिलांची आर्थिक प्रगती होते. स्वत:च्या संसारास हातभार लावू शकतात. या उद्योगामध्ये वारणानगरसह पाच ते सहा गावातील महिला पापड लाटण्याचे काम करतात.

सध्या संस्थेचा व्याप वाढला आहे. विक्रीमध्ये झपाट्याने वाढ झाल्याने नफाही वाढला आहे. आजूबाजूच्या गावातील महिलांना केंद्रापर्यंत आणणे व त्यांना परत त्यांच्या भागामध्ये पोहोच करण्यासाठी संस्थेने बस खरेदी केली आहे. या बसद्वारे महिलांना मोफत नेणे व आणण्याची सोय केली आहे. तसेच या शाखेने स्वत:च्या मालकीची भव्य अशी इमारत बांधली आहे. या

इमारतीध्ये आधुनिकरित्या वेगवेगळे विभाग केले आहेत की जेणेकरून सर्व कामकाज सुलभतेने करता येईल.

या शाखेची मागील तीन वर्षाची खरेदी, विक्री, नफा आकडेवाडी (रूपयांमध्ये) पुढीलप्रमाणे:

**सारणी क्रमांक ४.१**

**श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या संस्थेची प्रगती दाखविणारी आकडेवारी (१९९७-९८ ते १९९९-२०००)**

| साल | खरेदी | विक्री | नफा |
|---|---|---|---|
| १९९७-९८ | ५८,५८,१०४ | १,२३,२७,३९३ | २०,३९,६२७ |
| १९९८-९९ | ६९,९७,६८३ | १,४२,४९,३७५ | २३,२३,३३८ |
| १९९९-२००० | ७३,००,६७५ | १,३१,४३,९०९ | १४,८४,००० |

सुरूवातीला रोज २० किलो पापड तयार होत आज ही उत्पादनक्षमता १००० किलोपर्यंत जाऊन पोहोचली आहे. आज सुमारे ४०० भगिनी या उद्योगात काम करित आहेत व संस्थेचे सध्याचे भाग भांडवल २५ लाख रूपयांपर्यंत आहे.

संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई विलासराव कोरे यांची श्री महिला गृहउद्योग लिज्जत पापड, मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळावर तसेच सल्लागार मंडळावर पण सन्माननीय निवड झाली आहे.

तसेच कोल्हापूर जिल्ह्यामधील 'आदर्श महिला सहकारी संस्था' म्हणून या संस्थेला जिल्हा उद्योग पुरस्कार कोल्हापूर जिल्ह्याचे कलेक्टर मा. अरविंद सींग यांचे हस्ते प्राप्त झाला आहे.

श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्रामध्ये काम करणाऱ्या महिलांना पापडाची मजूरी ही रोजच्या-रोज दिली जाते. आदल्या दिवशीच्या पापडाची मजूरी ही दुसऱ्या दिवशी पापड घालण्यास आलेल्या वेळेस दिली जाते. त्यामुळे या मिळणाऱ्या मजूरीतून घरी दररोज लागणाऱ्या वस्तूंपैकी दूध व भाजीपाला अशा प्रकारच्या दैनंदिन अत्यावश्यक गरजेच्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी हे रोजचे पैसे महिलांना उपयोगी पडतात. शिवाय त्यातून उरलेल्या पैशांची महिला बचत करत असतात.

महिलांना बचतीची सवय लागावी या उद्देशाने पापड केंद्राशेजारीच श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेची स्थापना केलेली आहे. या ठिकाणी पापड करणाऱ्या महिला ह्या आपल्या रोजच्य मिळणाऱ्या मजूरीतून पिग्मी भरत असतात.

पापड तयार करण्यासाठी पापडाचे पीठ देत असताना त्या पिठाचे वजन करून दिले जाते व त्या पिठाचे ठराविक आकाराचे किती पापड तयार होतात याचे प्रमाण ठरलेले असते. जर त्या प्रमाणापेक्षा पापड कमी झाले तर किंवा पापडाची क्वालिटी खराब असेल तर त्यांच्या पापडाच्या होणाऱ्या मजूरीतून नाकारलेल्या पापडाचे पैसे वसुल केले जाता व उर्वरित मजूरीची रक्कम त्या महिलांना दिली जाते. अशा व्यवस्थेमुळे योग्य वजनाचे योगय आकाराचेच पापड करण्याचे प्रमाण सर्व महिलांचे असल्याचे दिसून येते.

बाहेरील ऑर्डरप्रमाणे ठराविक आकाराच्या पापडाचे उत्पादन केले जाते.

## III) <u>श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर</u> :-

### १) <u>स्थापना</u> :-

वारणा विविध उद्योग व शिक्षण समुहाचे संस्थापक सहकारमहर्षी कै. तात्यासाहेब कोरे यांच्या मनोधारणेनुसार समाजाचा १/२ भाग असणाऱ्या स्त्री वर्गाने सामाजिक कार्याचा वाटा उचलला पाहिजे या प्रेरणेतून श्री वारणा भगिनी मंडळ या संस्थेची स्थापना १९७५ साली झाली. सध्या संस्थेच्या अध्यक्षा म्हणून मा. श्रीमती शोभाताई विलासराव कोरे काम पहात आहेत.

२) **<u>ध्येय व उद्दिष्टे</u>** :-

महिलांची व बालबालिकांची सर्वांगिण उन्नती करणे व त्यांना स्वावलंबी बनविणे हे या संस्थेचे ध्येय आहे. १) महिलांची व मुलामुलींची कौटुंबिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, बौद्धिक, आरोग्य विषयक सामाजिक आणि आर्थिक उन्नती घडवून आणणे आणि त्यासाठी त्यांना सर्वतोपरी सहाय्य करणे. २) महिलांमध्ये समाजसेवेची आवड निर्माण करणे व त्यांच्या मधील नेतृत्व गुणांचा विकास करणे. ३) यंत्रांची दुरूस्ती, पुस्तक बांधणी, शिवणयंत्र, विणकाम, पाकशाळा, चित्रकला, संगीत इ. कलांचे सुलभ पद्धतीने प्रशिक्षण देणे. ४) जीवनावश्यक व इतर वस्तूंचा रास्त किंमतीत पुरवठा करणेसाठी ग्राहक भांडारे उभारणे, ती चालविणे व त्यासाठी खरेदी विक्रीचे व्यवहार करणे. ५) विविध प्रकारची प्रदर्शने भरविणे, उत्पादित मालाच्या स्पर्धा आयोजित करणे व त्यात सहभागी होणे. ६) सांस्कृतीक व सामाजिक उपक्रम घडवून आणून परस्पर सहकार्य वाढीस लावणे व महिला संघटन मजबूत करणे. ७) अनाथ व निराधार महिलांना स्वावलंबी बनविणे.

३) **<u>उत्पादने</u>** :-

वारणा भगिनी मंडळामार्फत खाद्य पदार्थांच्या उत्पादनामध्ये फरसाणा, शेव पापडी, खारी डाळ, लाल वाटाणा, राजीगरा लाडू, चिरमुरे लाडू, नाचणी पापड, बटाटा वेफर्स, चिवडा मसाला, चकली मसाला, ताकाचा मसाला, मटण मसाला इ. नवीन खाद्यपदार्थांचे उत्पादन सुरू केले आहे.

याचबरोबर मकर संक्रांतीचे वेळेस तिळाचे लाडू, दिवाळीचे वेळी बुंदीचे लाडू, चिवडा, चकली, अनारस पीठ, अशा पदार्थांचे उत्पादन केले जाते.

तसेच वारणा परिसरातील सर्व संस्था व सोसायट्या यांना जनरल मिटींगच्या वेळी अल्पोपहार म्हणून चिवडा, बर्फी, पेढे इ. पदार्थांचे पॅकेट तयार करून पाठविले जाते. निरनिराळ्या संस्थांना व खाजगी व्यक्तिंना घरगुती कार्यक्रमासाठी गरम पदार्थ म्हणजे पोहे, उप्पीट, शिरा, इडली चटणी, बटाटेवडा, दहीवडा, थालीपीठ, उडीदवडा, मिसळ, भडंग इ. पदार्थ पुरविले जातात. वरील

पदार्थांच्याशिवाय या वारणा भगिनी मंडळामार्फत ५०० ते १००० पर्यंत माणसांच्या जेवणाच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातात.

वारणा भगिनी मंडळामार्फत सन १९९६ मध्ये रेडिमेड कापड विभाग सुरू केला आहे. शिलाई काम करणाऱ्या महिलांना या विभागामध्ये काम दिले जाते. परकर, पेटीकोट, बंड्या, शाळेचे युनिफॉर्म, कामगारांचे युनिफॉर्म इ. चे कटींग करून त्यासाठी लागणारे मटेरियल (दोरा, बटन, हुक्स, कॉलर इ.) घरी दिले जाते व ऑर्डरप्रमाणे महिला कपडे शिवुन जमा करतात. यासाठी मटेरिअल चांगल्या क्वालिटीचे वापरले जाते.

**४) विक्री व्यवस्था :-**

भगिनी मंडळामार्फत तयार होणारा माल वारणा बझारला विक्रीस पाठविला जाते. यामुळे शिवणकाम करणाऱ्या महिलांना आर्थिक मदत झाली आहे. या विभागामध्ये २५ महिलांना काम दिले आहे.

**५) सभासद संख्या विक्री व नफ्यातील वाढ :-**

**सारणी क्रमांक ४.२**

**श्री वारणा भगिनी मंडळाची प्रगती दाखविणारी आकडेवारी (१९९७-२०००)**

| साल | सभासद संख्या | खरेदी | विक्री | नफा |
|---|---|---|---|---|
| १९९७-९८ | ३५० | १२,४९,५८७ | १७,३०,४२१ | ३,७५,१०५ |
| १९९८-९९ | ४०० | २६,४०,१०१ | ३८,१७,२०४ | ४,८७,६२५ |
| १९९९-२००० | ५०० | १६,७०,४१५ | ३०,४७,९७७ | ४,५०,२१६ |

**६) सांस्कृतीक कार्यक्रम :-**

वारणा परिसरातील महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून मा. शोभाताई कोरे यांनी सांस्कृतीक मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात.

महिलांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्लाईड शो, महिलांना उपयुक्त अशी व्याख्याने, नवरात्रामधील विविध गुणदर्शन कार्यक्रम, नृत्य स्पर्धा, पाककृती स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वेगवेगळ्या पदार्थांचे व उद्योगाचे प्रशिक्षण, महिला नेतृत्व शिबीर, असंघटीत महिलांसाठी शासनामार्फत शिबीरे, फनिगेम्स्, आरोग्य विषयक व्याख्याने, महिलांची वैद्यकीय तपासणी यासारखे उपक्रम राबविले जातात. ज्या महिलांना गाण्याची आवड आहे त्यांच्याकरिता भजीनमंडळ स्थापन केले आहे. या मंडळाला बऱ्याच ठिकाणाहून कार्यक्रमासाठी आमंत्रणे येतात. वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्धामध्ये ही भजनीमंडळ सहभागी होते. खेळाची आवड असणाऱ्या महिलांना बॅडमिंटनची सुविधा आहे. हस्तलिखित विशेषांक स्पर्धेमध्येही भगिनी मंडळाच्या सभासद महिला सहभागी झाल्या आहेत.

### ७) <u>विशेष सहली</u> :-

श्री वारणा भगिनी मंडळातील महिलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अंतर्गत वर्षातून १ ते २ वेळा सहली काढल्या जातात. त्यापैकी एक सहल ही १ ते २ दिवसाची अर्शा 'लहान सहल'असते व दुसरी ४ ते ५ दिवसांची 'मोठी सहल' काढली जाते. या सहली प्रत्येक वेळेस वेगवेगळ्या ठिकाणी काढल्या जातात.

## IV) <u>श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर</u> :-

वारणा महिला सहकारी पतसंस्थेमध्ये सर्वच्या सर्व महिला सभासद आहेत हे या पतसंस्थेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या पतसंस्थेमध्ये वारणा नगरमधील विविध उद्योग व शिक्षण समुहातील कर्मचारी व्यक्तिंच्या घरातील महिलांनाच सभासद करून घेतले आहे व त्यांच्या नावावरतीच कर्जप्रकरण करून त्या व्यक्तीस कर्ज पुरवठा केला जातो.

व्यक्तिंना कर्ज पुरवठा करित असताना त्या व्यक्ति ज्या संस्थेत काम करित आहेत त्या ठिकाणच्या नोकरीच्या पगाराचा दाखला कर्ज प्रकरणास जोडावा लागतो व संबंधीत संस्थेतील

प्रमुख अधिकाऱ्याची त्या दाखल्यावरती कर्ज देणेस हरकत नाही अशी शिफारस घ्यावी लागते व ते कर्ज प्रकरण त्या व्यक्तिच्या पत्नीच्या, आईच्या नावावरती त्यांना सभासद करून घेऊन कर्ज मंजूर केले जाते व संस्थेमार्फत महिन्याच्या पगारातून कर्जाच्या हप्त्याची कपात केली जाते. त्यामुळे कर्ज थकबाकीमध्ये जाण्याची शंकाच नसते. या कारणांमुळे कर्जदाराचे कर्ज ठराविक वेळेत भागले जाते व त्यामुळे कर्जदाराबरोबर पतसंस्थेचाही फायदा हा होत असतो.

वारणानगरमधील १००% कर्जवसुली होणारी ही एकमेव पतसंस्था आहे. म्हणून संस्थेच्या स्थापनेपासूनच सतत 'अ' वर्ग संस्था म्हणून या संस्थेला ऑडिट वर्ग मिळत आहे.

या पतसंस्थेची महिन्यातून दोन वेळा संचालिका मंडळाची मिटींग होते. यावेळेस सर्वानुमते ठराव, कर्जप्रकरणे व इतर बाबींची चर्चा केली जाते.

वारणा महिला सहकारी पतसंस्था ही श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, श्री वारणा भगिनी मंडळ, श्री वारणा बझार यांच्याशी संलग्न असल्यामुळे या ठिकाणच्या महिलांना पैशाच्या देव-घेवीचे व्यवहार करण्यासाठी इतरत्र बाहेर कोठेही जावे लागत नाही. तसेच या पतसंस्थेमध्ये वारणानगरमधील विविध संस्थांच्या ठेवी ह्या आकर्षक व्याजावरती ठेवुन घेतलेल्या आहेत. त्यामुळे या संस्थेचा उत्कर्ष दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे.

या पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रत्येक वर्षी एक वेळा बोलावली जाते. संस्थेच्या सर्व सभासदांना बोलावून घेतले जाते व त्या ठिकाणी सर्वांच्या समोर संस्थेच्या गतवर्षातील संपूर्ण कामकाजाचे अहवाल वाचन केले जाते व सभासदांचे प्रश्न, अडी-अडचणी समजून घेतल्या जातात.

या पतसंस्थेतील कामगारांना पगार हा रिझर्व्ह बँकेच्या लोकांच्या पगाराच्या प्रमाणात दिले जातात तसेच दिवाळीच्या वेळेस बोनस दिला जातो.

**१) स्थापना :-**

श्री वारणा सहकारी पतसंस्थेची स्थापना वारणानगर या ठिकाणी दि. २७ मार्च १९९० रोजी झाली.

**२) उद्दिष्टे :-**

वारणा परिसरातील महिलांना बचतीची सवय लागावी व अडीअडचणीच्या वेळी त्यांना हक्काने कर्ज मिळणे आवश्यक आहे. ह्या दोन्ही हेतूंनी वारणा महिला पतसंस्थेची स्थापना करण्यात आली.

**३) संचालक मंडळ :-**

वारणा महिला सहकारी पतसंस्थेमध्ये संचालक मंडळामध्ये श्रीमती शोभाताई कोरे ह्या अध्यक्षा असून इतर ९ महिला संचालिका आहेत.

**४) संस्थेचे सभासद :-**

**सारणी क्रमांक ४.३**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेतील सभासद संख्या**
**प्रगतीची आकडेवारी (१९९५ ते २००१)**

| साल | सभासद संख्या |
|---|---|
| १९९५-९६ | १६३१ |
| १९९६-९७ | १७४० |
| १९९७-९८ | १७५६ |
| १९९८-९९ | १७७१ |
| १९९९-२००० | १७८२ |
| २०००-२००१ (३१ मार्च २००१ अखेर) | १८३५ |

सारणी क्रमांक ४.३ वरून असे दिसून येते की, १९९५-९६ या वर्षामध्ये १,६३१ सभासद संख्या होती. त्यामध्ये वाढ होवून ३१ मार्च २००१ अखेर एकूण सभासद संख्या १,८३५ इतकी झाली आहे.

५) **संस्थेचे भागभांडवल** :-

**सारणी क्रमांक ४.४**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेतील संस्थेच्या भागभांडवलाची प्रगतीची आकडेवारी (१९९८ ते २००१)**

| | रूपये |
|---|---|
| ३१ मार्च १९९८ अखेर | १०,५४,४५०=०० |
| ३१ मार्च १९९९ अखेर | १२,५१,६५०=०० |
| ३१ मार्च २००० अखेर | १४,०२,३२०=०० |
| ३१ मार्च २००१ अखेर | १५ लाख |

सारणी क्रमांक ४.४ वरून असे दिसून येते की, ३१ मार्च १९९८ अखेर संस्थेचे भाागभांडवल १०,५४,४५०=०० रूपये इतके होते. त्यामध्ये वाढ होवून ३१ मार्च २००१ अखेर रूपये १५,००,०००=०० भागभांडवल झाले आहे.

६) **संस्थेकडे आलेल्या ठेवी** :-

**सारणी क्रमांक ४.५**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेकडे आलेल्या ठेवींची प्रगती दाखविणारी आकडेवारी (१९९५ ते २००१)**

| साल | साल अखेर ठेवी |
|---|---|
| १९९५-९६ | १५०.८८ |
| १९९६-९७ | २२१.५२ |
| १९९७-९८ | ३५५.७१ |
| १९९८-९९ | ५२१.२८ |
| १९९९-२००० | ६४३.७९ |
| २०००-२००१ | ८ कोटी ५० लाख |

सारणी क्रमांक ४.५ वरून असे दिसून येते की, सन १९९५-९६ या सालाअखेर संस्थेकडे १५०.८८ लाख रूपये ठेवी होत्या त्यामध्ये वाढ होवून सन २०००-२००१ या अहवाल सालाअखेर संस्थेकडे एकूण ८ कोटी ५० रूपयांच्या ठेवी गोळा झाल्या आहेत.

**७) संस्थेने केलेला कर्जव्यवहार :-**

**सारणी क्रमांक ४.६**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेने केलेल्या कर्जव्यवहाराची आकडेवारी (१९९५ ते २००१)**

| **साल** | **साल अखेर येणे** (आकडे रू. लाखात) |
|---|---|
| १९९५-९६ | १२३.७२ |
| १९९६-९७ | १७५.५५ |
| १९९७-९८ | २७६.९६ |
| १९९८-९९ | ३९३.२३ |
| १९९९-२००० | ४९२.४५ |
| २०००-२००१ | ६ कोटी ५० लाख |

सारणी क्रमांक ४.६ वरून असे दिसून येते की, संस्थेने सन १९९५-९६ या सालाअखेर १२३.७२ लाख रूपयांचा कर्जव्यवहार केलेला आहे. त्यामध्ये वाढ होऊन सन २०००-२००१ या वर्षाअखेर ६ कोटी ५० लाख रूपये कर्ज दिले आहे.

**८) गुंतवणूक :-**

**सारणी क्रमांक ४.७**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेने केलेली गुंतवणूक (१९९८ ते २००१)**

| | **रूपये** |
|---|---|
| दि. ३१/३/९८ अखेर | ८०,१२,०५५=०० |
| दि. ३१/३/९९ अखेर | १,३३,३९,८४३=०० |
| दि. ३१/३/२००० अखेर | १,५९,२४,४८५=०० |
| दि. ३१/३/२००१ अखेर | २ कोटी इतकी गुंतवणूक केली आहे |

सारणी क्रमांक ४.७ वरून असे दिसून येते की, संस्थेने ३१ मार्च १९९८ अखेर ८०,१२,०५५=०० गुंतवणूक केलेली आहे. त्यामध्ये वाढ होऊन ३१ मार्च २००१ अखेर एकूण २ कोटी रूपये इतकी गुंतवणूक केलेली आहे.

९) **राखीव निधी** :-

**सारणी क्रमांक ४.८**

**श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेकडील राखीव निधी (१९९८ ते २००१)**

| | **रूपये** |
|---|---|
| दि. ३१/३/९८ अखेर | १६,७१,२२१=५० |
| दि. ३१/३/९९ अखेर | २२,००,४५४=७७ |
| दि. ३१/३/२००० अखेर | ३२,३७,३००=८८ |
| दि. ३१/३/२००१ अखेर | ४२,००,०००=०० इतका आहे |

सारणी क्रमांक ४.८ वरून असे दिसून येते की, संस्थेकडे ३१ मार्च १९९८ अखेर १६,७१,२२१=५० इतका राखीव निधी होता. त्यामध्ये वाढ होऊन ३१ मार्च २००१ अखेर एकूण ४२,००,०००=५० इतका राखीव निधी शिल्लक आहे.

१०) **खेळते भांडवल** :-

**सारणी क्रमांक ४.९**

**श्री वारणा महिला पतसंस्थेकडील खेळते भांडवल प्रगतीची आकडेवारी (१९९८ ते २००१)**

| | **रूपये** |
|---|---|
| दि. ३१/३/९८ अखेर | ३,९१,७१,७१४=६४ |
| दि. ३१/३/९९ अखेर | ५,७०,४८,९३३=३० |
| दि. ३१/३/२००० अखेर | ७,१२,९३,४०३=०६ |
| दि. ३१/३/२००१ अखेर | ९,००,००,०००=०० इतके आहे |

सारणी क्रमांक ४.९ वरून असे दिसून येते की, संस्थेकडे ३१ मार्च १९९८ अखेर ३,९१,७१,७१४=६४ इतके खेळते भांडवल होते. त्यामध्ये वाढ होऊन ३१ मार्च २००१ अखेर एकूण ९,००,००,०००=०० इतके खेळते भांडवल आहे.

**११) <u>एकूण उलाढाल</u> :-**

**<u>सारणी क्रमांक ४.१०</u>**

**<u>श्री वारणा महिला पतसंस्थेने केलेली एकूण उलाढाल (१९९८ ते २००१)</u>**

| साल | रूपये |
|---|---|
| दि. ३१/३/९८ अखेर | १३,६६,९९,९८०=०० |
| दि. ३१/३/९९ अखेर | २५,६७,००,०००=०० |
| दि. ३१/३/२००० अखेर | २६,६७,८७,८४९=४८ |
| दि. ३१/३/२००१ अखेर | ३५,००,००,०००=०० इतकी झाली आहे |

सारणी क्रमांक ४.१० वरून असे दिसून येते की, संस्थेने ३१ मार्च १९९८ अखेर १३,६६,९९,९८०=०० इतक्या रूपयांची उलाढाल केली होती. त्यामध्ये वाढ होऊन ३१ मार्च २००१ अखेर संस्थेने एकूण ३५,००,००,०००=०० इतक्या रूपयांची उलाढाल केली आहे.

**१२) <u>निव्वळ नफा</u> :-**

**<u>सारणी क्रमांक ४.११</u>**

**<u>श्री वारणा महिला पतसंस्थेडील निव्वळ नफ्याची प्रगती</u>**

**<u>दाखविणारी आकडेवारी(१९९८ ते २००१)</u>**

| साल | रूपये |
|---|---|
| दि. ३१/३/९८ अखेर | ४,१३,२९४=०२ |
| दि. ३१/३/९९ अखेर | ११,२२,५३०=७६ |
| दि. ३१/३/२००० अखेर | १५,३८,८०१=१८ |
| दि. ३१/३/२००१ अखेर | १५ लाख इतका झाला आहे |

सारणी क्रमांक ४.११ वरून असे दिसून येते की, संस्थेला ३१ मार्च १९९८ अखेर १,१३,२९४=०२ इतक्या रूपयांचा निव्वळ नफा झाला होता. त्यामध्ये वाढ होऊन ३१ मार्च २००१ अखेर संस्थेला एकूण १५,००,०००=०० इतक्या रूपयांचा निव्वळ नफा झालेला आहे.

श्री वारणा महिला पतसंस्थेची वाटचाल प्रगती पथावर चालू आहे. संस्थेचे मुख्य ऑफिस वारणानगर या ठिकाणी असून सावर्डे व मोहरे या ठिकाणी शाखा कार्यरत आहेत.

**१३) ठेव योजना :-**

१) रिकरिंग ठेव, २) लहान रक्कम-लाभ भक्कम ठेव, ३) शुभ लाभ रिकरिंग ठेव, ४) मासिक प्राप्ती ठेव, ५) वैभवलक्ष्मी ठेव योजना, ६) पेन्शन ठेव योजना

इ. वरील सर्व ठेव योजना कार्यरत आहेत. तसेच मुदतठेव व इतर ठेवीवरती चांगल्या प्रकारचे व्याज दिले जाते.

**१४) कर्ज पुरवठा :-**

श्री वारणा महिला सहकारी पत संस्थेमार्फत सभासद महिलांना शेवया मशीन, शिलाई मशीन, घरगुती वह्या-पुस्तके बायडींग, गाय-म्हैस खरेदीसाठी, घर बांधणे अगर दुरूस्तीसाठी, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी, मुला-मुलींच्या विवाह कार्यासाठी कर्जाचा पुरवठा केला जातो.

वारणानगरच्या या सर्व महिला संस्थांना मा. श्रीमती शोभाताई कोरे यांचे नेतृत्व लाभले आहे.

## ⁕ संदर्भ ⁕

१) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणागनक (वारणा बझार), वार्षिक अहवाल सन १९९७-९८, १९९८-९९, १९९९-२०००, २०००-२००१.

२) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर, माहिती पुस्तिका सन १९९७-९८, १९९८-९९, १९९९-२०००, २०००-२००१.

३) श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड, शाखा- वारणानगर माहिती पुस्तिका १९९७, १९९८, १९९९, २०००, २००१.

४) श्री वारणा महिला सहकारी पत संस्था लि., वारणानगर वार्षिक अहवाल १९९५, १९९६, १९९७, १९९८, १९९९, २०००, २००१.

⁕⁕⁕⁕⁕